अस्सल सोलापुरी
# सुराज्य
सोलापूर
सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

। शनिवार, दि. २७ डिसेंबर २०२५ ।
www.surajyadigital.com ▸ वर्ष : २४ वे ▸ अंक : ८९ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने १२

# निष्ठावंत पॅटर्न



- दोघा देशमुख आमदारांकडून भाजपला घरचा आहेर
- उमेदवारींमधील मनमानीची मोठी खदखद बाहेर
- पालकमंत्री जयाभाऊंवर उघडपणे रोष व्यक्त करत दिला इशारा

## महापालिकेचा रणसंग्राम

✔ सोलापूर/खास प्रतिनिधी

सोलापूर महानगरपालिकेच्या निवडणुकीचा आखाडा जसा चांगलाच तापला आहे. त्याप्रमाणं शहरातील तब्बल साधारण २२ प्रभागांमध्ये उमेदवाऱ्या देण्याच्या मनमानीवरुन भाजपमध्ये नाराजीचा असंतोष उफाळला आहे. पक्षामधील अंतर्गत नाराजीचा स्फोट झाला. या उफाळलेल्या वादासंबंधी आमदार विजयकुमार देशमुख आणि आमदार सुभाष देशमुख यांनी तोंड उघडलत मनामधील खदखद बाहेर काढली.उमेदवाऱ्यांच्या प्रकरणावरुन त्यांनी थेट इशारा देत पक्षाला घरचा आहेर दिला. उमेदवाऱ्या आणि निवडणुकीमधील एकूणच सूत्र हलवणं यावरुन जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्यावर दोघा देशमुखांनी उघडपणे रोष व्यक्त करत 'निष्ठावंत कोणत्याही पक्षात गेले तर त्यांचा आम्ही प्रचार करु' असं सांगत जणू काही पालकमंत्र्यांना इशारा दिला आहे.

### पक्षात मोठी खळबळ; फोनाफोनीतून श्रेष्ठींपर्यंत निरोप

निष्ठावंतांना भाजपच्या उमेदवारीतून डावले गेल्यास संबंधित निष्ठावंत कोणत्याही पक्षात गेले तर आम्ही त्यांचा प्रचार करणार, त्यांना निवडून आणणार यासंबंधी आमदार सुभाष देशमुख आणि आमदार विजयकुमार देशमुखांनी दिलेल्या थेट इशाऱ्यांनतर खुद्द भाजपसह निवडणूक आखाड्यात उतरणाऱ्या अन्य पक्षांमध्ये खळबळ माजली. तद्वत या पक्षामधील काही अतिउत्साही कार्यकर्त्यांनी देशमुखांनी दिलेल्या इशाऱ्याच्या व्हिडीओ पक्षामधील वरिष्ठ स्तरावरच्या नेतेमंडळींना पद्धतशीररित्या पोचवल्या.



### 'उत्तर'संबंधी मालकांचा थेट पालकमंत्र्यांवर रोष

आमदार विजयकुमार देशमुख यांनी शहर उत्तर विधानसभा मतदार संघामधील उमेदवाऱ्यांसंबंधी पालकमंत्री जयकुमार गोरेंवर उघडपणे रोष व्यक्त केला. ते म्हणाले, 'निवडणुकीच्या जिल्ह्याच्या वाटाघाटीचं पालकमंत्री हेच बघत आहेत, रघुनाथ कुलकर्णींना बाजूना केल्यानंतर कोणीच आलं नाही, पक्षात कान आलेल्यांनी जुन्याच्या मुलाखती घेतल्या, काय वाटलं असेल त्यांना, तरीही आम्ही सहन केलं, पालकमंत्री हेच 'उत्तर'चं सर्व पाहात आहेत, पण पाच टर्म आमच्यासोबत असलेल्या निष्ठावंतांच्या पाठिशी उभं राहणं हे कर्तव्य आहे, ते कोणत्याही पक्षातून उभे राहिले तर त्यांच्याविरुद्ध प्रचार करणार नाही'

# उमेदवारी देण्यावरुन नाराजीचा असंतोष उफाळला; मालक, बापूंचा 'निष्ठावंत पॅटर्न' पुढं आला!



## DHURANDHAR देशमुख

### सुभाष देशमुख 'हे' देखील म्हणाले...

पंधरा दिवसांपूर्वी पक्षात आलेले लोक आमच्या उमेदवारांच्या मुलाखती घेत आहेत असे सुभाष देशमुख म्हणाले. या निवडणुकीत उमेदवार किती खर्च करणार किंवा त्याची किती क्षमता आहे याबाबत मुलाखतीतून विचारणा होते याचं आश्चर्य वाटतं असल्याचे मत सुभाष देशमुख यांनी व्यक्त केले. भाजपमध्ये अशा पद्धतीने किती खर्च करणार हे विचारण्याची पद्धत नव्हती आणि नाही असे देशमुख म्हणाले.

### आमदार विजयकुमार मालकांचं मर्मावर बोट

निष्ठावंत कार्यकर्त्यांवर अन्याय झाल्यास ते कुठल्याही पक्षातून उभे राहू दे आम्ही कार्यकर्त्यांच्या पाठीशी उभं राहणार असल्याची भूमिका आमदार विजयुकाम देशमुख यांनी घेतली आहे. निवडणूक समितीत कोण-कोण आहेत मला माहिती नाही. त्यामुळे जागांच्या वाटघाटी हे केवळ पालकमंत्री जयकुमार गोरे करत आहेत. कोणाशी चर्चा करायच्या हे माहिती नसल्याने मी कुठेही चर्चेला गेलो नसल्याचे मत विजयकुमार देशमुख यांनी व्यक्त केले आहे.

विशेषत्वे, एकमेकांचं साधं तोंडदेखील न पाहणारे कट्टर राजकीय हाडवैरी आमदार विजयकुमार देशमुख आणि आमदार सुभाष देशमुख हे सोलापूर महापालिका निवडणुकीत एकत्र आलेले दिसत असून उमेदवाऱ्यांमध्ये होत असलेल्या मनमानीच्या प्रकरणात त्यांनी 'मिले सूर मेरा तुम्हारा' ही भूमिका घेतल्याचे दिसते. शुक्रवार (ता.२६) सकाळी आमदार सुभाष देशमुख यांनी आमदार विजयकुमार देशमुख यांच्या 'सिध्दलिला' या निवासस्थानी जाऊन गुप्तपणे तासभर चर्चा केली. त्यानंतर या दोघांनी प्रसारमाध्यमांपुढे ज्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या त्या सारख्याच होत्या. त्यावरुन सोलापूर महापालिका निवडणुकीच्या आखाड्यात देशमुखशाहीमधील हे दोघे भाजप आमदार एकत्र झाल्याचे स्पष्ट झाले.

# लवकरच सन्मानजनक युती होईल : शिंदे

✔ ठाणे/प्रतिनिधी

महापालिका निवडणुकांसाठी शिवसेना आणि भाजपमध्ये सन्मानजनक युती होईल. एक ते दोन दिवसांत त्यास अंतिम स्वरुप दिले जाईल, असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्पष्ट केले. युती झाली पाहिजे, असे स्पष्ट आदेश मुख्यमंत्री फडवणीस यांचे आहेत. ते प्रत्येक महापालिकेचा आढावा घेत आहेत, असेही शिंदे म्हणाले.

ठाणे येथे शुक्रवारी शिंदे यांच्या उपस्थितीत प्रकाश महाजन यांनी शिंदे गटात पक्ष प्रवेश केला. त्यावेळी शिंदे यांनी माध्यमांशी संवाद साधला. शिवसेना आणि भाजप विचारांची युती आहे. केंद्रात आणि महाराष्ट्रात महायुतीचे सरकार आहे. बाळासाहेबांची विचारधारा पुढे घेऊन जाण्याचे काम शिवसेना करत आहेत,असे ते म्हणाले.

महाराष्ट्रात महापालिका निवडणुकांसाठी म हायुतीच्या बैठका सुरू आहेत. महायुती म्हणून आम्ही निवडणूक लढविणार आहोत. युतीची चर्चा अंतिम टप्प्यात आहे. आमची युती सत्तेसाठी, खुर्चीसाठी, स्वार्थासाठी झालेले नाही. सध्या युत्या-आघाड्या होत आहेत. त्या फक्त खुर्ची, स्वार्थ आणि सत्ता यासाठी होत असल्याची टीका शिंदे



यांनी ठाकरे गट आणि मनसेवर केली. आगामी महापालिका निवडणुकीत बाळासाहेबांचे विचार आणि विकासाचा अजेंडा घेऊन लोकांसमोर जात आहोत. सन्मानजनक युती होणार असून फडणवीस हे स्वतः दररोज त्याचा आढावा घेत आहेत. प्रत्येक महापालिकेतील पदाधिकाऱ्यांना ते स्वतः बोलवित आहेत आणि युतीच्या बद्दल विचारणा करत आहेत. युती झाली पाहिजे असे स्पष्ट आदेश फडणवीस यांचे आहेत. महायुती प्रचंड मतांनी विजयी होईल, असा दावा शिंदे यांनी केला.

# पुण्यात धक्कातंत्र; एकी अखेर बारगळली

## शरदराव महाविकास आघाडीसोबत

✔ पुणे/प्रतिनिधी

पुण्याच्या राजकारणात सध्या काय सुरु आहे? असा प्रश्न आता अनेकांना पडला आहे. कारण पुणे महापालिकेची निवडणूक जाहीर झाली तेव्हा दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणार असल्याच्या चर्चांना उधाण आले. पण आता वेगळ्याच घडामोडी घडताना दिसत आहेत.

ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांनी एकीचे हे वृत्त फेटाळले आणि नंतर त्यांनीच पक्षाला सोडचिट्ठी दिली. त्यांनी आता काँग्रेसमध्ये प्रवेश केला आहे.

विशेष म्हणजे दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्याच्या चर्चांना पोषक असणारं वातावरण देखील यावेळी बघायला मिळालं. कारण शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे खासदार अमोल कोल्हे आणि आमदार रोहित पवार यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांची भेट घेतली.

या भेटीत जागावाटपावर चर्चा झाली. दोन्ही राष्ट्रवादीच्या नेत्यांची गुरुवारी रात्री एकत्र येण्याबाबत अवांतर चर्चा झाली. त्यानंतर शुक्रवारीदेखील शरद पवारांच्या शिष्टमंडळाने अजित पवारांसोबत चर्चा केली. यावेळी दोन्ही राष्ट्रवादींमध्ये जागावाटपावर चर्चा झाली. दोन्ही राष्ट्रवादीच्या नेत्यांमध्ये झालेल्या चर्चेवेळी अजित पवार यांनी शरद पवारांच्या पक्षाला केवळ ३५ जागा



देण्याचा प्रस्ताव ठेवला. तसेच या सर्व जागांवर शरद पवारांच्या राष्ट्रवादीने घड्याळ चिन्हावर निवडणूक लढवायची, असाही आग्रह अजित पवारांनी ठेवला. अजित पवारांचे हे दोन्ही प्रस्ताव शरद पवारांच्या राष्ट्रवादीने नाकारले. त्यामुळे दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्याची फिस्कटली. विशेष म्हणजे अजित पवारांच्या पक्षासोबत बोलणी फिस्कटली. शरद पवारांच्या राष्ट्रवादीत वेगळ्या घडामोडी घडल्या. शरद पवारांच्या पक्षाचे ज्येष्ठ नेते दुपारी मुंबईत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्या भेटीसाठी त्यांच्या 'मातोश्री' निवासस्थानी गेले. आपण महाविकास आघाडी म्हणून निवडणूक लढवण्याबाबत चर्चा करण्यासाठी आल्याचं जयंत पाटील यांनी बैठकीनंतर स्पष्ट केलं. जगताप यांच्या राजीनाम्यावरुन शरद पवार यांच्या पुरोगामी भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थति केले जात होते. कारण अजित पवार यांच्या राष्ट्रवादीसोबत युती करण्यास

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



'मीच रंग बदलू शकतो', हा माझा गैरसमज होता !

कल्याण
260-84-789

मुंबई
190-06-457

# १०० टक्के गुलाल उधळू म्हणून गेले; उमेदवारीच्या टप्प्यावर कोंडीत सापडले!

✔ सोलापूर/प्रतिनिधी

भाजपमधील जुन्या कार्यकर्त्यांना डावलून नव्याने प्रवेश दिलेल्या २२ प्रभागातील नगरसेवकांची गोची होणार असून भाजप पक्ष कार्यालयाकडून जुन्या पदाधिकाऱ्यांना उमेदवारींबाबत शब्द देण्यात आल्याची विश्वसनीय सूत्रांची माहिती असून त्यामुळे नव्याने भाजप पक्षात प्रवेश घेतलेल्या माजी नगरसेवकांची गोची होणार आहे.

नव्याने २२ प्रभागांतील माजी नगरसेवकांना भाजपात प्रवेश देण्यात आल्याने पक्षातील निष्ठावंत व दीर्घकाळ



काम करणाऱ्या कार्यकर्त्यांमध्ये तीव्र असंतोष पसरला आहे. वर्षानुवर्षे भाजपासाठी झटणाऱ्या जुन्या कार्यकर्त्यांना डावलून करण्यात आलेल्या या प्रवेशामुळे पक्षांतर्गत नाराजी वाढत असून, ही नाराजी येणाऱ्या मनपा निवडणुकित भाजपसाठी डोकेदुखी ठरण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

या असंतोषाची दखल थेट पक्षाच्या वरिष्ठ नेतृत्वापर्यंत पोचल्याचं कळतं. जुन्या भाजप पदाधिकारी आणि निष्ठावंत कार्यकर्त्यांना उमेदवारी न दिल्यास त्याचे गंभीर राजकिय परिणाम भोगावे लागतील, असा सूर स्थानिक पातळीवर उमटू लागल्यानंतर मुंबईतील भाजप कार्यालयाकडून महत्त्वाचे आश्वासन देण्यात आल्याचे खात्रीलायकरित्या सांगण्यात आलं.

### समतोल राखण्याची मोठी कसोटी

एका बाजूला भाजप आपली संघटनात्मक ताकद टिकवण्याचा प्रयत्न करत असताना, दुसऱ्या बाजूला नव्याने आलेल्या नेत्यांच्या अपेक्षांवर पाणी फिरण्याची चिन्हे दिसत आहेत. त्यामुळे आगामी मनपा निवडणूक केवळ बाहेरील पक्षांशी नव्हे, तर भाजपातील अंतर्गत समतोल राखण्याचीही मोठी कसोटी ठरणार, अशी चर्चा राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे.

प्राप्त माहितीनुसार, येणाऱ्या मनपा निवडणुकित जुन्या आणि पक्षाशी एकनिष्ठ असलेल्या भाजप पदाधिकाऱ्यांनाच प्राधान्याने उमेदवारी दिली जाईल, असे आश्वासन पक्ष नेतृत्वाकडून देण्यात आले आहे.

यामुळे उत्साहाच्या भरात सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसला रामराम ठोकून भाजपात प्रवेश केलेल्या माजी नगरसेवकांची चांगलीच कोंडी होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.